# प्रकरण दुसरे

## "माधवनगर कॉटन मिल्स् - अभ्यास नमुन्यातील कामगारांचा प्राथमिक परिचय"

# प्रकरण दुसरे

## "माधवनगर कॉटन मिल्स् - अभ्यास नमुन्यातील कामगारांचा प्राथमिक परिचय"

### कामगारांची व्यक्तिगत माहिती :

माधवनगर कॉटन मिल्स् लि. माधवनगर या गिरणीतील कामगारांचा सामाजिक - आर्थिक अभ्यास हा संशोधनाचा अभ्यास विषय असल्याने मिलमध्ये प्रत्यक्ष उत्पादन कार्यात सहभागी असलेल्या कामगारांची व्यक्तिगत पार्श्वभूमी अभ्यासणे गरजेचे ठरते. कामगारांचे वय, वैवाहिक दर्जा, कुटुंबातील सदस्य संख्या, कामगाराचा कामाचा हुद्दा, नोकरीचा कालावधी, शिक्षण यासारख्या विविध घटकांचा प्रभाव कामगारांच्या व्यक्तिगत जीवनावर पडतो. त्यातून कामगारांच्या बहुतांश जीवन पैलूंचे ज्ञान प्राप्त होते. कामगारांच्या सामाजिक - आर्थिक स्थितीकडे डोकावून पाहण्यासाठी कामगारांबाबतची व्यक्तिगत माहिती ही पहिली पायरी ठरते. माधवनगर कॉटन मिल मधील कामगारांच्या सामाजिक - आर्थिक सर्वेक्षणाच्या हेतूने निवडलेल्या ३३ कामगारांकडून भरून घेतलेल्या मुलाखत पत्रिकेवरून कामगारांच्या व्यक्तिगत माहिती बाबत पुढील प्रमाणे प्रकाश पडतो -

१.१ वयोमानानुसार रचना -

तक्ता क्र. २.१

| कामगाराचे वय | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १८ वर्षापेक्षा कमी | - | - |
| १९ ते ३० वर्षे | २ | ६.१ |
| ३१ ते ४५ " | २२ | ६६.६ |
| ४६ ते ६० " | ९ | २७.३ |
| ६० वर्षावरील | - | - |
| एकूण .. | ३३ | १००.०० |

कामगाराच्या कामावर त्याच्या वयाचा प्रभाव पडतो. त्यामुळे पर्यायाने त्याच्या सामाजिक - आर्थिक स्थितीवर त्याच्या वयाचा प्रभाव पडतो. म्हणूनच कामगारांच्या वयोमानानुसार रचनेला अधिक महत्त्व प्राप्त होते. सदर अभ्यास पाहणीत १८ वर्षाखालील मुलांचा नोकरीत अजिबात सहभाग नसल्याचे दिसते. त्यामुळे सदर गिरणीत बाल कामगार समस्या निर्माण होण्याचा प्रश्नच नाही. १९ ते ३० या वयोगटातील कामगार संख्या फक्त २ आहे. म्हणजेच गिरणीत शेकडा ६.१ कामगार १९ ते ३० या वयोगटातील आहेत. ३१ ते ४५ या वयो-गटात २२ असून अशा वयोगटातील कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६६.६ आहे. ४६ ते ६० वर्षे या वयोगटात ९ कामगार आहेत. सदर गिरणीत अशा कामगारांचे शेकडा प्रमाण २७.३ आहे. ६० वर्षावरील एकही कामगार नाही. ३० वर्षावरील कामगार ३३ पैकी ३१ आहेत. म्हणजेच गिरणीत जवळ जवळ शेकडा ९४ कामगार ३० वर्षावरील आहेत.

## १.२ कामगारांचा वैवाहिक दर्जा -

तक्ता क्र. २.२

| वैवाहिक दर्जा | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| अविवाहित | - | - |
| विवाहित | ३३ | १०० |
| घटस्फोटीत | - | - |
| विधूर | - | - |
| विधवा | - | - |
| एकूण .. | ३३ | १०० |

व्यक्तिगत जीवनातील महत्वाचा घटक म्हणून वैवाहिक जीवनाला महत्व प्राप्त होते. व्यक्ती विकासातील महत्वाचा मार्ग तिथूनच पुढे जातो. म्हणूनच कामगारांचा सामाजिक - आर्थिक अभ्यास करताना त्यांचा वैवाहिक दर्जा अभ्यासणे गरजेचे ठरते. सदर गिरणीतील निवड कामगारांच्यात अविवाहित, घटस्फोटीत, विधूर, विधवा यांचे प्रमाण शून्य आहे. मुलाखत घेतलेले सर्वच्या सर्व म्हणजेच १०० टक्के कामगार विवाहित आहेत. त्यामुळे कौटुंबिक जबाबदारीची जाणिव असणारे सर्वच्या सर्व कामगार आहेत. अशा कामगारांना आपल्या कामाच्या जबाबदारीची निश्चितच जाणीव असते. सदर गिरणीस १९४८ चा कारखाना कायदा लागू झाल्यानंतर स्त्रियांना रात्रपाळीचे काम देणे अडचणीचे झाल्याने, शिफ्ट बदलण्याची समस्या निर्माण झाली. त्यामुळे स्त्री कामगार भरती बंद असल्याने, गिरणीत वायडिंग विभागात एकच स्त्री कामगार असल्याने गिरणीत विधवा स्त्री कामगारांचा प्रश्नच येत नाही.

१.३ जातीनुसार वर्गीकरण -

अ) मुख्य वर्गीकरण :

तक्ता क्र. २.३

| जात | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| हिंदू | ३० | ९१ |
| मुसलमान | ३ | ९ |
| एकूण .. | ३३ | १०० |

जात म्हटले म्हणजे आपल्या मनात एकदम वेगळीच भावना निर्माण होते. भारत हा अनेक जाती-जमातींचा देश आहे. माणूस इथून तिथून सारखाच पण जातीवरुन व्यवसाय ठरविला जात असे. आठरा पगड जातीच्या देशात हिंदु-मुस्लिम या दोन प्रमुख गटात त्याचे प्रामुख्याने वर्गीकरण केले जाते. सदर गिरणीत निवड कामगारांपैकी ३० कामगार हिंदू असून गिरणीतील त्यांचे शेकडा प्रमाण ९१ आहे. तर ३ कामगार मुसलमान असून गिरणीतील त्यांचे शेकडा प्रमाण ९ आहे.

मात्र या दोन्ही जातीचे कामगार गिरणीत एकीने, परस्पर सहकार्याने काम करतात.

ब) उपवर्गीकरण :

तक्ता क्र.२.४

| जात | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| मराठा | १४ | ४२.४ |
| मुसलमान | ३ | ९.१ |
| इतर मागासवर्गीय | १६ | ४८.५ |
| एकूण .. | ३३ | १००.०० |

सदर गिरणीतील कामगारांचे उप जातीनुसार केलेले वर्गीकरण तक्ता क्र. २.४ वरून लक्षात येते. सदर गिरणीत धनगर, माळी, हरिजन, ख्रिश्चन, मराठा, मुसलमान असे भिन्न भिन्न जातीचे कामगार काम करतात, त्यांचे वर्गीकरण मराठा, मुसलमान आणि इतर मागासवर्गीय अशा गटांमध्ये केले. सदर गिरणीत १४ कामगार मराठा आहेत. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण ४२.४ आहे. ३ कामगार मुसलमान असून त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९.१ आहे. तर १६ कामगार इतर मागासवर्गीय गटातील (ओ.बी.सी., बीसी.) आहेत. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण ४८.५ आहे.

सदर गिरणीत भिन्न भिन्न जातीचे कामगार असले तरी ते एकत्र काम करतात, परस्परांना गिरणीत, गिरणीच्या बाहेर अडी अडचणीच्या वेळी सहकार्य करतात. जाती भेद त्यांच्यात अजिबात नाही.

१.४ भाषेनुसार वर्गीकरण -

तक्ता क्र. २.५

| कामगारांची भाषा | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| मराठी | २७ | ८१.८ |
| हिंदी | ३ | ९.१ |
| कानडी | ३ | ९.१ |
| एकूण .. | ३३ | १००.० |

सदर गिरणीत काम करणारे कामगार भिन्न भिन्न जाती धर्माचे आहेत. सहाजिकच भिन्न-भिन्न भाषिक कामगारांचा त्यात सहभाग होतो. सदर गिरणीत निवड कामगारांपैकी २७ कामगार मराठी भाषिक आहेत. गिरणीत ही भाषा बोलणाऱ्या कामगारांचे शेकडा प्रमाण ८१.८ आहे. ३ कानडी भाषिक आहेत. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९.१ आहे. ३ कामगार हिंदी भाषिक आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ९.१ आहे. सदर गिरणीत मराठी भाषिक कामगारांचे सर्वाधिक प्रमाण (८१.८ टक्के) आहे. भिन्न भाषिक लोक एकत्र काम करताना परस्परांना समजून घेतात. भाषेवरून कोणताही छोटा-मोठा वाद, संघर्ष निर्माण झालेला नाही. अगर भाषेची अडचण कामाच्या ठिकाणी उद्भवत नाही. असे मुलाखतीच्या वेळी कामगारांकडून समजले.

## १.५ कामगारांच्या शैक्षणिक दर्जानुसार वर्गीकरण -

तक्ता क्र. २.६

| शैक्षणिक दर्जा | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| अशिक्षित | २ | ६.१ |
| प्राथमिक शिक्षण | ११ | ३३.३ |
| माध्यमिक शिक्षण | २० | ६०.६ |
| महाविद्यालयीन शिक्षण | - | - |
| एकूण .. | ३३ | १००.०० |

कामगाराच्या शैक्षणिक दर्जाचा उत्पादनावर परिणाम होतो. त्यामुळे कामगाराच्या शिक्षणाला महत्व प्राप्त होते. कामगार शिकलेला असेल तर कामाबाबतचे ज्ञान त्याला तात्काळ होते. कामात सुलभता आणाणे, उत्पादनाचा दर्जा उंचावणे, कामाचा उरक यासारखे फायदे त्यामुळे मिळू शकतात. गिरणीत सुशिक्षित कामगारांचे प्रमाण अधिक असेल तर आधुनिकीकरणाचा अवलंब करणे अडचणीचे ठरत नाही.

सदर गिरणीतील नमुना पध्दतीनुसार निवडलेल्या ३३ कामगारांपैकी २ कामगार अशिक्षित आहेत. म्हणजेच सदर गिरणीत शेकडा ६.१ कामगार अशिक्षित आहेत. ४ थी ते ५ वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षक घेतलेले ११ कामगार आहेत. गिरणीत अशा कामगारांचे शेकडा प्रमाण ३३.३ आहे. माध्यमिक शिक्षण घेतलेले २० कामगार आहेत. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६०.६ आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेतलेला एकही कामगार

नाही. सुशिक्षित - अशिक्षित असे वर्गीकरण केले तर २ कामगार अशिक्षित असल्याने गिरणीतील अशिक्षितांचे शेकडा प्रमाण ६.१ आहे. तर ३१ कामगार सुशिक्षित आहेत. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९३.९ म्हणजे ९४ आहे. ही बाब समाधानकारक आहे. तरीही निवड कामगारांपैकी फक्त ३ कामगारांनी तांत्रिक शिक्षणाचा आय्.टी.आय्. चा कोर्स पूर्ण केलेला आहे. तांत्रिक शिक्षण घेतलेल्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९ आहे. हे प्रमाण अल्प असल्याचे दिसते.

१.६ व्यवसायानुसार वर्गीकरण -

तक्ता क्र. २.७

| मुख्य व्यवसाय | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| नोकरी | ३० | ९१ |
| शेती | ३ | ९ |
| एकूण .. | ३३ | १०० |

सदर गिरणीतील ३३ निवड कामगारांपैकी ३० कामगार नोकरी हा मुख्य व्यवसाय करतात. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९१ आहे. तर फक्त ३ कामगारांचे मुख्य व्यवसाय शेती असल्याचे दिसून आले. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९ आहे. शेती हा मुख्य व्यवसाय असलेले कामगार कुटुंबाला आणखी आर्थिक हातभार म्हणून नोकरी करतात. मात्र नोकरी हाच मुख्य व्यवसाय करणाऱ्या शेकडा ९१ कामगारांना कुटुंबाच्या उदरनिर्वाहाच्या दृष्टीने इतर अन्य उत्पन्नाचा मार्ग नसल्याचे नोकरीचा मार्ग स्वीकारणे क्रमप्राप्त होते असे कामगारांच्या बोलण्यातून लक्षात आले.

## १.७ कामगारांच्या नोकरीच्या कालखंडावरुन वर्गीकरण -

कामगार किती वर्षे नोकरी करीत आहे याला त्याच्या व्यक्तिगत विकासात महत्व प्राप्त होते. नोकरीचा कालावधी जितका अधिक तितका कामगाराचा अनुभव वाढतो, कामात सहजता येते, कामाचा दर्जा सुधारतो, तेच ते काम सतत केल्याने कामातील धोक्याची कल्पना येते. अनुभव हा कामगाराच्या व्यक्तिविकासातील एक पैलू असल्याने तो महत्त्वाचा ठरतो.

तक्ता क्र. २.८

| नोकरीचा कालावधी | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| ० ते ५ वर्षे | - | |
| ६ ते १० वर्षे | २ | ६.१ |
| ११ ते १५ वर्षे | १३ | ३९.४ |
| १६ ते २० वर्षे | ९ | २७.३ |
| २१ ते २५ वर्षे | २ | ६.० |
| २६ ते ३० वर्षे | १ | ३.० |
| ३१ ते ३५ वर्षे | ६ | १८.२ |
| एकूण .. | ३३ | १००.०० |

सदर गिरणीतील निवड कामगारांपैकी ५ वर्षापेक्षा कमी काल नोकरी केलेला एकही कामगार नाही. ६ ते १० वर्षे या कालावधीत नोकरी करणारे २ कामगार आहेत. म्हणजेच गिरणीत शेकडा ६.१ कामगार आहेत. ११ ते १५ वर्षापर्यंत नोकरी करीत असलेले १३ कामगार आहेत. अशा कामगारांचे

गिरणीतील शेकडा प्रमाण ३९.४ आहे. १६ ते २० वर्षापर्यंत नोकरी करणारे ९ कामगार असून अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २७.३ आहे. २१ ते २५ वर्षापर्यंत नोकरी करणारे २ कामगार असून गिरणीतील त्यांचे शेकडा प्रमाण ६.१ आहे. २६ ते ३० वर्षे नोकरी करणारा एक कामगार असून अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३ आहे. ३१ ते ३५ वर्षे इतका दीर्घ काळ काम करणारे ६ कामगार असून अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १८.२ आहे.

५ वर्षापेक्षा कमी काळ नोकरी करणारा एकही कामगार नाही. त्यामुळे गिरणीत अलिकडे नोकर भरती जवळ-जवळ बंद असल्याचे दिसते. १० वर्षापेक्षा अधिक काळ नोकरी करीत असलेले ३३ पैकी ३१ कामगार आहेत. म्हणजे शेकडा ९४ कामगार हे १० वर्षापेक्षा अधिक काळ नोकरीत आहेत. २० वर्षापेक्षा अधिक काळ नोकरीत असलेले शेकडा २७ कामगार आहेत तर ३० वर्षापेक्षा अधिक वर्षे नोकरीत असलेले कामगार शेकडा १८ आहेत.

## १.८ कामगारांचे व्यवसायिक शिक्षण / प्रशिक्षणानुसार वर्गीकरण :

तक्ता क्र. २.९

| तांत्रिक शिक्षण | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| तांत्रिक शिक्षण घेतलेले | ३ | ९ |
| तांत्रिक शिक्षण न घेतलेले | ३० | ९१ |
| एकूण .. | ३३ | १०० |

शिक्षण, नोकरीतील कालखंड, प्रशिक्षण यावरून कामगारांचे कौशल्य वाढते. कुशल कामगारांचे प्रमाण जितके अधिक असेल तितकी कारखान्याची उत्पादकता वेगाने वाढते, उत्पादन खर्च घटतो, उत्पादनाचा दर्जा सुधारतो. सदर गिरणीत निवड कामगारांपैकी फक्त ३ कामगारांनी तांत्रिक शिक्षणाचा कोर्स केलेला आहे. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९ आहे. तांत्रिक शिक्षण न घेतलेले ३० कामगार असून सदर गिरणीतील अशा कामगारांचे शेकडा प्रमाण ९१ आहे ही बाब निराशाजनक आहे.

सदर गिरणीतील कामगार कुशलतेचा विचार केला तर व्यावसायिक प्रशिक्षण घेतल्यामुळे कुशलता प्राप्त झालेले कामगार कमी म्हणजे शेकडा फक्त ९ आहेत. मात्र तेच ते काम दीर्घकाळ करून अनुभव, कुशलता प्राप्त झालेले कामगार अधिक आहेत. वरती अभ्यासल्याप्रमाणे १० वर्षापेक्षा अधिक काळ नोकरी करणारे शेकडा ९४ कामगार आहेत. अनुभवी कामगार कुशल कामगार म्हणून संबोधने योग्य ठरते. सदर गिरणीत व्यवसायिक शिक्षण/प्रशिक्षणाशिवाय अनुभवाने कौशल्य प्राप्त केलेले कामगार अधिक आहेत.

## १.९ कामावर येताना वापरल्या जाणाऱ्या वाहनाच्या प्रकारानुसार वर्गीकरण :

कामगाराची वैयक्तिक माहिती मिळविताना कामगार कामावर येताना कोणत्या वाहनाचा वापर करतो हे अभ्यासणे आवश्यक ठरते. कामगाराच्या वाहनाचा त्याच्या कार्यक्षमतेशी संबंध प्राप्त होतो. कमीत कमी वेळात, कमी त्रासात, कामगार कामावर येऊ शकला तर त्याची कार्यक्षमता वाया जाण्याचा प्रश्नच येत नाही.

तक्ता क्र. २.१०

| वाहनाचा प्रकार | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| पायी चालत | ६ | १८.२ |
| सायकल | २५ | ७५.८ |
| बस | १ | ३.० |
| रेल्वे | - | - |
| मोटर सायकल | १ | ३.० |
| इतर | - | - |
| एकूण .. | ३३ | १००.० |

सदर गिरणीत तासगांव, भिलवडी स्टेशन, निंबळक, विसापूर, दुधोंडी, बुधगांव, करघणी, मौजे डिग्रज, मिरज, कुमठे, कौलापूर, बुर्ली, कोरेगांव असे आसपासच्या आणि लांबच्या ठिकाणचेही कामगार आहेत. लांबच्या ठिकाणचे कामगार माधवनगर, बुधगांव अशा ठिकाणी राहतात. तासगांव, भिलवडी स्टेशन, विसापूर, कुमठे, डिग्रज, कौलापूर, मिरज अशा ठिकाणचे कामगार आपल्या गांवावरून कामावर येतात. सदर गिरणीतील कामगार कामावर येताना निवड कामगारांपैकी ६ कामगार पायी चालत येतात. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १८.२ आहे. २५ कामगार सायकलवरून येतात. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ७५.८ आहे. प्रत्येकी १ कामगार बस आणि मोटर सायकलने येतो. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण प्रत्येकी ३ आहे. रेल्वे अगर इतर वाहनाचा वापर करणारा एकही कामगार नाही. शहराच्या ठिकाणी राहण्यास येणारा खर्च न परवडणारा असल्याने, घरी शेती अगर अन्य व्यवसायाकडे

लक्ष देता यावे म्हणून बहुतांश कामगार आपल्या गांवावरून कामावर येतात. त्यामुळे सर्वाधिक म्हणजे शेकडा ७५-७६ कामगार कामावर येताना सायकलचा वापर करतात.

कामगारांना कामावर येताना बस अगर इतर वाहनाची सोय बहुतांश कारखान्यात केली जाते. अन्यथा वाहन खरेदी साठी कामगाराला रक्कम देऊन त्याच्या पगारातून त्या रकमेची कपात केली जाते. अगर वाहतून खर्चा-पोटी म्हणून काही रक्कम कामगाराला दिली जाते. सदर गिरणीत अशा कोणत्याही प्रकारची सुविधा उपलब्ध नाही.

......